# हवामान आधारीत कृषि सल्ला
# ग्रामिण कृषि मौसम सेवा, ऐएमएफ़ु, राहुरी,
# कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com

## ८१) हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला समितीची साप्ताहिक बैठक दि. ०६.१२.२०२४

जिल्हा : अहमदनगर

| मागील आठवड्यातील हवामान (२९/११/२०२४ ते ०५/१२/२०२४) | | | | | | | हवामान घटक | पुढील पाच दिवसांचा हवामान अंदाज (०७/१२/२०२४ ते ११/१२/२०२४) | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| २९ | ३० | ०१ | ०२ | ०३ | ०४ | ०५ | दिनांक | ०७ | ०८ | ०९ | १० | ११ |
| ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | ०.० | पाऊस (मिमी) | ५ | ० | ० | ० | ० |
| २८.० | २७.४ | २७.६ | २८.६ | २९.४ | २९.४ | ३०.६ | कमाल तापमान (अंसे) | २ | २९ | २८ | २७ | २७ |
| ८.३ | ८.७ | १२.३ | १२.५ | १२.७ | १४.५ | १३.३ | किमान तापमान (अंसे) | २० | १७ | १२ | १० | ९ |
| ०.० | ०.० | २.० | २.० | ४.० | ४.० | २.० | ढग स्थिती (आकाश) | ५ | ४ | ४ | ४ | ५ |
| ७२ | ७६ | ८० | ७४ | ७८ | ८७ | ९१ | सकाळची सापेक्ष आर्द्रता (%) | ७७ | ७८ | ७८ | ७५ | ७६ |
| ३४ | ४० | ५० | ४७ | ६२ | ५७ | ५१ | दुपारची सापेक्ष आर्द्रता (%) | ५२ | ५३ | ५४ | ५३ | ५२ |
| १.८ | २.७ | १.३ | १.६ | १.६ | १.४ | १.३ | वाऱ्याचा वेग (किमी/ तास) | ३ | ३ | ४ | ६ | ९ |

### हवामान अंदाजावर आधारित कृषी सल्ला

| पीक | अवस्था | कृषि विषयक सल्ला |
|---|---|---|
| हवामान सारांश | | प्रादेशिक हवामान केंद्र, मुंबई यांचेकडून प्राप्त झालेल्या हवामान अंदाजानुसार पुढील पाच दिवस आकाश ढगाळ राहण्याची शक्यता आहे. |
| सामान्य सल्ला | | हवामान अंदाज आधारित कृषी सल्ला व हवामानचा पूर्वानुमानाकरीता मेघदुत मोबाईल ॲपचा वापर करावा. |
| संदेश | | पुढील पाच दिवस आकाश ढगाळ राहण्याची शक्यता आहे. |
| हरभरा | रोप अवस्था | ढगाळ वातावरणामुळे घाटेआळीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. घाटे अळीच्या सर्वेक्षणासाठी हेक्टरी ५ कामगंध सापळे जमिनीपासून १ मीटर उंचीवर लावावेत. पिक सुरवातीला कायिक वाढीत असतांना ५ % निंबोळी अर्क किंवा ॲझाडिरॅक्टिन ०.३०% डब्लूएसपी ३०० पीपीएम ५० मिली प्रती १० लिटर पाण्यात मिसळून पहिली प्रतिबंधात्मक फवारणी व १५ दिवसांच्या अंतराने दुसरी फवारणी केल्यास घाटे अळीचा पतंग पिकावर अंडी घालण्याचे टाळतो. किडीने आर्थिक नुकसान पातळी ओलांडल्यास रासायनिक किटकनाशके इमामेक्टीन बेन्झोएट ०५% एसजी ४.४ ग्रॅम किंवा इमामेक्टीन बेन्झोएट १.९०% ईसी ७.५ मिली किंवा इंडोक्झाकार्ब १४.५०% एससी ८-१० मिली किंवा इंडोक्झाकार्ब १५.८०% ईसी ७ मिली किंवा लॅम्ब्डासायहॅलोथ्रीन ०५% ईसी १२.५ मिली किंवा स्पीनेटोरम ११.७०% एससी किंवा फ्लुबेंन्डामाईड ८.३३% + डेल्टामेथ्रीन ५.५६% एससी ५ मिली किंवा नोव्हॅल्युरॉन ५.२५% + इंडोक्झाकार्ब ४.५०% एससी. १७ मिलि प्रति १० लिटर पाण्यात मिसळून वरील पैकी एका किटकनाशकाची आलटून पालटून फवारणी करावी. |
| गहू | मुकुटमुळे फुटण्याची अवस्था | ढगाळ वातावरणामुळे मावा व तुडतुडे या किडींचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता असल्याने किडींच्या प्रादुर्भावाची आर्थिक नुकसान पातळीस दिसून येताच १ ग्रॅम थायामिथॉक्झाम २५ डब्लूजी प्रति १० लीटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| करडई | रोप अवस्था | जमिनीत पडणाऱ्या भेगातून पाण्याचे बाष्पीभवन होते. जमिनीत ओलावा टिकवण्यासाठी व हवा खेळती राहण्यासाठी तसेच, तणांचे नियंत्रण करण्यासाठी शेतात २५ – ३० दिवसांनी कोळपणी करून घ्यावी. |
| रब्बी मका | वाढीची अवस्था | पिक दीड ते दोन महिन्याचे झाल्यावर २५ % नत्राचा तिसरा हप्ता द्यावा. |
| भाजीपाला पिके | | ढगाळ वातावरणामुळे रस शोषणाऱ्या किडीचा प्रादुर्भाव वाढण्याची शक्यता आहे. रस शोषणाऱ्या किडीच्या नियंत्रणासाठी डायमेथोएट ३० ईसी १५ मिली किंवा इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल ४ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| टोमॅटो | | पिनवर्मचा प्रादुर्भाव झाल्यास, प्रति एकर १६ पिवळे चिकट सापळे शेतात लावावेत. जास्त प्रादुर्भाव झाल्यास क्लोरॅंट्रानिलीप्रोल १८.५ एससी @ ३ मिली किंवा फ्लुबेन्डियामाइड ४८० एससी @ ३ मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| वांगी | | शेंडे व फळ पोखरणाऱ्या अळीचे नियंत्रण करण्यासाठी प्रति एकर ५ फेरोमोन सापळे वापरून नियमित निरीक्षण करावे. प्रादुर्भाव झालेले शेंडे आणि फळे गोळा करून जमिनीत खोलवर गाडावीत. जास्त प्रादुर्भाव असेल तर क्लोरपायरीफॉस २० ईसी @ २० मिली किंवा इमामेक्टिन बेंझोएट ५ एसजी @ ४ ग्रॅम किंवा थायोडीकार्ब ५० डब्ल्यूपी @ १५ ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| मिरची | | लीफ कर्ल विषाणूच्या व्यवस्थापनासाठी, झाडाचा प्रादुर्भाव झालेला भाग काढून टाकणे आणि हा विषाणू पसरविणाऱ्या पांढरी माशीचे नियंत्रण करण्यासाठी ॲसिटामिप्रिड २० एसपी @ ३ ग्रॅम प्रति १५ लिटर |

दूरध्वनी : ०२४२६ २४३२३९ ईमेल:rahuri.amfu@gmail.com


| | | |
|---|---|---|
| | | पाण्यात मिसळून फवारणी करावी. |
| **पशुधन** | | थंडीच्या वातावरणात धुईचे प्रमाण वाढल्यामुळे सध्या तापमानात थोडी वाढ झाली आहे. अशा परिस्थितीमध्ये विषाणूजन्य आजारांत वाढ होण्याची शक्यता असते. ऊस तोडणी हंगाम असल्याने जनावरांची वाहतूक मोठ्या प्रमाणात होत आहे, तरी लाळ्या खुरकूत आजाराचे लसिकरणाबाबत आग्रही रहावे. या कालावधीत फुप्पुस दाह होण्याची शक्यता जास्त असते त्यामुळे काळजी घेणे गरजेचे आहे. |
| **आंबा** | | तुडतुड्यांच्या नियंत्रणासाठी आंब्याला फुलोरा येण्यापूर्वी इमिडाक्लोप्रिड १७.८ एसएल @ ३ मिली किंवा थायामेथोक्सॅम २५ डब्ल्यूजी @ ४ ग्रॅम किंवा बुप्रोफेझिन २५ एससी @ २० मिली किंवा डेल्टामेथ्रीन २.८ ईसी @ ५ मिली किंवा लॅम्बडा सायहॅलोथ्रीन ५ ईसी @ १० मिली प्रति १० लिटर पाण्यात मिसळून संपूर्ण झाडावर फवारणी करावी. |
| **एरंडी** | | केसाळ आणि स्पोडोप्टेरा अळीच्या नियंत्रणासाठी बॅसिलस थुरिंगिएन्सिस ०.५ डब्लूपी. @ २० ग्रॅम प्रति १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. जास्त प्रादुर्भाव झाल्यास डायमिथोएट ३० ईसी @ २० मिली किंवा मॅलाथिऑन ५० ईसी @ २० मिली प्रति १० लिटर पाणी लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी. |

**स्त्रोत** :
१) हवामान पूर्वानुमान : प्रादेशिक हवामान पूर्वानुमान केंद्र, मुंबई.
२) मागील हवामान : भारत मौसम विज्ञान विभाग वेधशाळा पाणी व्यवस्थापन प्रकल्प, मफुकृवि, राहुरी.

ठिकाण : मफुकृवि, राहुरी.
दि. : ०६.१२.२०२४

**स्वाक्षरीत**
**प्रमुख अन्वेषक, ग्राकृमौसे, ऐएमएफयु, राहुरी तथा**
**प्रमुख, कृषि विद्या विभाग, मफुकृवि, राहुरी.**